# ओम जगद्गुरु जन शांती धर्मसोहळ्याचे ध्वजारोहण उत्साहात



**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील आज दि, ९ क्षेत्र वेरूळ येथे जगद्गुरु जनार्दन स्वामी यांच्या ३६ वे पुण्यस्मरण उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या दरम्यान श्रीक्षेत्र वेरूळ येथे बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर भगवान यांच्या परिसरात या धार्मिक सोहळा पार पडणार आहे या सोहळ्याच्या पूर्व तयारीसाठी आज रविवारी भव्य ध्वजारोहण सोहळ्याचे आयोजन केलेले होते सोहळ्याचे प्रमुख वैशिष्ट्य अनुष्ठान यज्ञ नंदादीप महिला जप नामस किर्तन एकनाथी भागवत पारायण अखंड अन्नदान अशा विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन या सोहळ्याच्या दरम्यान करण्यात येणार आहे ३६ व्या पुण्यस्मरणाचे प्रमुख आकर्षण ७५१ कुंडी यज्ञ हे असून या दरम्यान आठ दिवस मौनवृत्तांमध्ये पुरुष व महिला हे परमपूज्य बाबाजींनी दिलेल्या गुरु मंत्राचा जप करणारा असून याची संख्या ११००० / आहे मात्र या कार्यक्रम तब्बल आठ दिवस चालणार आहे सोहळा जगद्गुरु उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे जय बाबाजी भक्त परिवारासह राज्यभरातील लाखो भाविक पूजनीय साधुसंत व राजकीय क्षेत्रातील विविध पक्षांचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती या सोहळ्या च्या दरम्यान असणार आहे जय बाबाजी भक्त परिवाराच्या दृष्टीने परम पूज्य बाबाजींचे पुण्यस्मरण म्हणजे मोठा सोहळा असतो भाविक वर्षभर या सोहळ्याची तयारी करत असतात हा भव्य दिव्य सोहळा यशस्वी होण्यासाठी जगद्गुरू स्वामी शांतिगिरी महाराज यांचे मार्गदर्शनाखाली विविध समित्याची नियुक्ती केले जाते यामुळे या सोहळ्याला येणाऱ्या भाविकांची व्यवस्था, गैरसोय हो नाही म्हणून लाखो भाविकांची उत्तम व्यवस्था करण्यात येत आहे.या सोहळ्याला आठ दिवस असताना परमपूज्य बाबाजींचे पुण्यस्मरणाची सोहळे महाराष्ट्र सह देशभर या सोहळ्यांचा कौतुक होतात ना दिसते कारण या सोहळ्यामध्ये देव देश व धर्म हे समोर ठेवून येणारी पिढी घडविण्याचे काम बाबाजींच्या हस्ते होत असते दिवसेंदिवस लाखो लोक वेगवेगळ्या व्यसनांना बळी पडत आहे त्यातून मुक्ती देण्याचे महान कार्य जगद्गुरु जनार्दन स्वामी यांच्या पुण्यस्मरण सोहळ्याच्या निमित्ताने सातत्याने होत आहे असाच प्रयत्न होऊ घातलेल्या पुण्यस्मरण सोहळ्यामध्ये परम पूज्य जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे आजच्या पवित्र पर्वकाळावर या भव्य सोहळ्याचे ध्वजारोहण राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे गंगापूर खुलताबाद मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब, देवगड संस्थांचे उत्तर अधिकारी स्वामी प्रकाश नंद गिरी महाराज ह भ प मेटे महाराज आश्रम हे संत महंत सेवागिरी महाराज उद्योजक मनोज पवार अनिल भैय्या चोरडिया घृष्णेश्वर देवस्थानचे अध्यक्ष विकी दांडगे उपाध्यक्ष योगेश टोपरे माजी.सभापती गणेश नाना अधाने यांच्यासह जय बाबाजी भक्त परिवारातील नाशिक जळगाव धुळे अहिल्यानगर जालना पुणे ठाणे बीड व परभणी जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती..

वेरूळ आश्रमामधून आज ध्वजारोहण सोहळ्यानिमित्त भव्य शोभा यात्रेचे आयोजन केले होते यामध्ये परमपूज्य बाबाजी यांची पालखी व उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांची रथामधून मिरवणूक काढण्यात आली यामध्ये जय बाबाजी भक्त परिवारासह बाबाजींच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश होता अनेक मान्यवर असं परमपूज्य बाबाजीच्या मार्गदर्शनाने सोहळ्याचा समारोप होऊन महाप्रसादाने याची सांगता झाली दिनांक २५ नोव्हेंबर ते दोन डिसेंबर या दरम्यान आयोजित ओम जगद्गुरु जन शांती धर्म सोहळ्यामध्ये भाविक भक्तांनी तन-मन धनाने सहभागी व्हावे असे आव्हान जय बाबाजी भक्त परिवाराचे वतीने राजेंद्र पवार यांनी केले .

# पोलीस पब्लिक अ‍ॅकॅडमी म्हणजे भावी अधिकारी घडवणारी फॅक्टरी

## माजी सहा. पोलीस आयुक्त तसेच मार्गदर्शक बालाजी सोनटक्के व सहा. पोलीस आयुक्त संपत शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पोलीस पब्लिक अ‍ॅकॅडमीचे उद्घाटन माजी सहा. पोलीस आयुक्त तसेच मार्गदर्शक बालाजी सोनटक्के व सहा. पोलीस आयुक्त संपत शिंदे यांच्या हस्ते टीव्ही. सेंटर छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. परिक्षेच्या माध्यमातून विद्यार्थी निवड तसेच यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक, भेट वस्तू देण्यात आली. पोलीस पब्लिक अ‍ॅकॅडमीचे उद्घाटन कार्यक्रमात उपस्थित उद्याचे अधिकारी, पोलीस, तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यासाठी तयार होणाऱ्या भावी अधिकारी असणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली.

पोलीस पब्लिक अ‍ॅकॅडमीचे प्रमुख मार्गदर्शक बालाजी सोनटक्के म्हणाले की, विद्यार्थ्यांना कमी फिसमध्ये दर्जेदार शिक्षण देवून भावी पिढी घडवावी, तसेच वातानुकूलित हॉलमध्ये विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याची व्यवस्था तसेच इतर महत्त्वपूर्ण सुविधा ही देण्यात येणार आहे. ही आनंदाची बाब आहे. पोलीस पब्लिक अ‍ॅकॅडमीतर्फे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विशेष सवलत त्यांच्या पात्रतेनुसार देण्यात येईल, असे पोलीस पब्लिक अ‍ॅकॅडमीचे प्रमुख मार्गदर्शक बालाजी सोनटक्के साहेब यांनी सांगितले.

# राजपूत समाजातील पदोन्नती प्राप्त कर्तव्यनिष्ठ अधिकारी सन्मान सोहळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

राजपूत परदेशी शिक्षक कृती समिती, महाराष्ट्र राज्य शाखा छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने ङ्गराजपूत समाजातील पदोन्नती प्राप्त कर्तव्यनिष्ठ अधिकारी सन्मान सोहळाङ्ख जिप शिक्षक पतसंस्था येथे आज शनिवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. खुशालसिंग परदेशी (अप्पर आयुक्त) यांनी भूषवले तर परसराम बहुरे,तोताराम दादा बहुरे,दारासिंग राजपूत,मंगलसिंग सिंगल, संतोष ताठे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्यकरणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सत्कारमूर्ती म्हणून सन्मानित अधिकारी: श्री. अशोकसिंग राजपूत सहाय्यक पोलीस आयुक्त, संभाजीनगर शहर, श्री. भागवतजी बिघोत मुख्याधिकारी, वैजापूर नगरपरिषद, श्री. चतरसिंग परदेशी उपशिक्षणाधिकारी (अधीक्षक पद) जिप जालना, डॉ.प्रा.भगवानसिंग डोभाळ, लोकमत आयकॉन पुरस्कार विजेते, यांनाही विशेष गौरव प्रदान करण्यात आला. या अधिकारी व मान्यवरांचा सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान समाजातील विविध वक्त्यांनी कर्तव्य, शिस्त आणि राजपूत परंपरेच्या अभिमानाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्कटतेने महेंद्र बारवाल तर आभार बिजू मारग यांनी केले. प्रास्ताविक पर सुभाष महेर यांनी राजपूत शिक्षक कृती समितीचे कार्य सांगून यांनी उपस्थितांनी आपले यश हे समाजासाठी अभिमानास्पद आहे, असा गौरवोद्गार काढला. तर पाहुण्याचा परिचय प्रा.भीमसिंग राजपूत यांनी केला. शिक्षक पत संस्थेच्या सभागृहात सन्मानाची व अभिमानाची भावना दाटून आली होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रमेश परदेशी, संजय परदेशी, शक्तीसिंग छानवाल, सतीश मचिये, डी.जे. राजपूत, संजय गोमलाडू, गणेश राजपूत, सुरेश परदेशी आदींसह शिक्षक व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणोरीचा अद्वितीय अखंड हरिनाम सप्ताह; ८८ वर्षांच्या या परंपरेचा सार्थ अभिमान वाटतो- आमदार अनुराधाताई चव्हाण



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मला लेक मानणाऱ्या, राजकीय वाटचालीत अमूल्य सहकार्य करणाऱ्या गणोरी गावचा अद्वितीय अखंड हरिनाम सप्ताह.. ८८ वर्षांच्या या परंपरेचा सार्थ अभिमान वाटतो. असे गौरवोदगार आमदार सौ.अनुराधाताई चव्हाण यांनी काढले. गणोरी येथे श्री संत रामलाला बाबा गेंदाई महाराजांनी चातुर्मास निमित्त तब्बल ८८ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास फुलंब्री मतदारसंघाच्या आमदार सौ.अनुराधा चव्हाण यांनी भेट दिली. हा सप्ताह परंपरा व सामाजिक एकतेचं प्रतीक आहे. येथे दरवर्षी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. केळीच्या पात्रावर वाढण्यात येणारा कडी, भात, बुंदीचा प्रसाद, हा या परंपरेचा अविभाज्य भाग आहे. या पवित्र सप्ताहाला परिसरातील भाविक मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहतात. गावातील मुली भाऊबीजेला न येता या सप्ताहाच्या निमित्ताने येतात, भाऊबीज करतात, ही परंपरा आजही तेवढ्याच आत्मीयतेने जपली जाते. गावाने मला लेक मानलं आहे, याच मातीचा एक घटक असल्याचा अभिमान नेहमीच अभिमान वाटतो, असे आमदार सौ.अनुराधा चव्हाण यांनी सांगितले. गणोरी गावाशी माझं नातं हे भावनिक ऋणानुबंधाचं आहे. महाप्रसादासाठी आवश्यक असलेल्या स्वयंपाकघराच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. या कामासाठी आमदार निधीतून रु.२० लाखांचा निधी दिला. याप्रसंगी संत श्री.महंतदास महाराज, पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# कामगार सेनेच्या राज्य संपर्कप्रमुखपदी रऊफ पटेल

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



शिवसेनेच्या श्रमिक राष्ट्रीय कामगार सेनेच्या महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुखपदी रऊफ पटेल यांनी नियुक्ती करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनांनुसार पटेल यांची नियुक्ती करण्यात आली असून संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब चव्हाण यांनी नियुक्तीपत्र दिले. त्यावर चव्हाण यांच्यासह प्रदेश सचिव अमित भटनागर आणि प्रदेश संघटक नाना बच्छाव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यावेळी संघटनेचे राज्य सहसचिव मनोज खैरे, पुणे जिल्हाप्रमुख माऊली जगताप, छत्रपती संभाजीनगरचे संपर्कप्रमुख मुसा हसन शेख, उपजिल्हाप्रमुख राजेंद्र कडू व बाबुराव मोरे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.